<u>नियमित दिवाणी मुकदमा क्र. ४८/२०१७</u>

निशाण क्र. ३८ लगत

**<u>वादीचा पुढील सरतपास वादीतर्फे विधिज्ञ श्री.व्ही.आर.नाईक यांचेमार्फत शपथेवर सुरु.</u>**

मी दाव्यामध्ये कागद यादी निशाणी क्र. ४/११ वर खरेदीखताची सहीसुद नक्कल हजर केली आहे. त्याची मुळ प्रत प्रतिवादी क्र. १ याच्याकडे आहे. त्यास **<u>निशाणी क्र. ४६</u>** देण्यात येते. (प्रतिवादी क्र. १ च्या वकीलांनी योग्य पध्दतीने दुय्यम पुरावा न दिल्यामुळे निशाणी देण्यास हरकत नोंदविली.) निशाणी क्र. ४/१३ वर माझ्या आईने माझ्या नावे करुन दिलेले कुलमुखत्यारपत्राची प्रत हजर केली असून आता मला ती दाखविली. त्यावर माझी व आईची सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **<u>निशाणी क्र. ४७</u>** देण्यात येते.

सरतपास पुर्ण.

प्रतिवादी क्र. १ च्या विधिज्ञांच्या विनंतीवरुन वादीचा उलट तपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.

श्रवणोत्तर स्वीकृत,

श्रीमती एन.बी.घाटगे

दि. ०८/११/२०२३

दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.